स्थापना २८.८.१९८९

''जनसामान्यांच्या विश्वासाचं प्रतिक''

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ




* वैयक्तिक कर्ज
* गृहतारण कर्ज
* वाहन तारण कर्ज
* व्यवसाय कर्ज
* बचत योजना
* तत्पर ग्राहक सेवा
* NEFT, RTGS व चेक क्लिअरींग सुविधा
* CBS प्रणाली
* कोणत्याही शाखेतून बँक व्यवहार
* एस्.एम्.एस. बँकींग सुविधा
* लॉकर्स सुविधा
* विना विलंब कर्ज वितरण सुविधा.




## ३४ वा वार्षिक अहवाल २०२२-२०२३

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ

## संचालक-मंडळ



**श्री. जयवंतराव बंडू काटकर**
संस्थापक



**श्री. प्रकाश पाटील**
अध्यक्ष



**श्री. मनोहर जाधव**
उपाध्यक्ष



**श्री. हणमंत घनवट**
संचालक



**श्री. प्रकाश पवार**
संचालक



**श्री. हरिश्चंद्र येरूणकर**
संचालक



**श्री. शशिकांत शिर्के**
संचालक



**श्री. जगदिश मोरे**
संचालक



**श्री. बाळासाहेब सोनजे**
संचालक



**श्री. राजेंद्र सोनकांबळे**
संचालक



**सौ. वनिता टिळेकर**
संचालिका



**सौ. शारदा कर्नाळे**
संचालिका



**श्री. विजय पाटील**
तज्ञ संचालक



**श्री. सुनिल घनवट**
कार्यकारी संचालक
(मुख्य व्यवस्थापक)



**श्री. पांडुरंग श्री. पाटील**
व्यवस्थापक

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ

पत्ता : १०३, साकेत अपार्टमेंट, पहिला माळा, वडवली विभाग, अंबरनाथ (पू.), जि. ठाणे - ४२१५०१.

जा. क्र. - श्री.म.ना.स.प./वा.सर्वसा. सभा नोटीस/४७/२०२३-२०२४ दि. १३.०८.२०२३

## वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना

(फक्त सभासदांसाठी)

स.न.वि.वि.

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ ह्या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, पतसंस्थेची सन २०२२-२३ या वर्षाची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २७.०८.२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. रोटरी क्लब, वडवली विभाग, अंबरनाथ (पू.) येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे. कृपया सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

### सभेपुढील कामकाजाचे विषय

१) दि. २१/०८/२०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) दि. ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षाचा, संचालक मंडळाने सादर केलेल्या अहवालास मान्यता देणे.
३) सन २०२२-२३ या वर्षाच्या मान्य अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा ज्यादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.
४) दि. ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षाचा, संचालक मंडळाने सादर केलेला ताळेबंद व खर्च-उत्पन्न पत्रकास मान्यता देणे.
५) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफ्याच्या विनियोगास मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
६) सन २०२३-२४ च्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.
७) सन २०२३-२४ या अर्थिक वर्षासाठी अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणुक करणे व मेहनताना ठरविणे.
८) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणुक करणे व मेहनताना ठरविणे
९) संचालक मंडळाने सेवानियमांतील केलेल्या दुरुस्तीला मंजूरी देऊन मान्यता देणे.
१०) मा. अध्यक्षांचे अनुमतीने, आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

सही/-
**सुनिल हणमंत घनवट**
कार्यकारी संचालक
(संचालक मंडळाच्या आदेशानुसार)

### विशेष सूचना

१) गणसंख्येच्या अभावी सभा तहकुब झाल्यास अशी स्थगीत झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी, अर्ध्या तासानंतर त्याच विषयांवर बोलविण्यात येईल. त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.
२) सभेचे कामकाज व्यवस्थित पार पाडता यावे या दृष्टीने, ज्या सभासदांना काही सूचना मांडावयाच्या असतील किंवा प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी आपल्या सुचना अगर प्रश्न सभेच्या ७ दिवस अगोदर लेखी स्वरुपात संस्थेच्या कार्यालयीन वेळेत आणून द्यावेत.
३) सभेस येतांना सभासदांनी आपला अहवाल सोबत आणावा.
**४) दहावी, बारावी, पदवी व समकक्ष उत्तीर्ण सभासद पाल्यांचा गुणगौरव समारंभ-प्रत्यक्ष उपस्थित पाल्यांनाच बक्षिस वितरण केले जाईल.**
**५) सभा संपल्यानंतर सभासदांना भोजन व्यवस्था करण्यात आली आहे.**

# ३४ वा वार्षिक अहवाल, सन २०२२-२०२३

## अध्यक्षीय मनोगत...

सन्माननीय सभासद, ठेवीदार, हितचिंतक बंधू भगिनींनो,

सप्रेम नमस्कार,

जसं मंदिरामध्ये देवाचं आणि शरीरामध्ये श्वासाचं स्थान आहे;

तसं महालक्ष्मी पतसंस्थेमध्ये विश्वासाचं स्थान आहे.

सर्व-सामान्यांच्या गरजा, स्वप्नं आणि ध्येय पूर्ण करण्यासाठी आम्ही अखंड कार्यरत आहोत, हे केवळ आमचं काम नाही तर कर्तव्य आहे. सर्वांना संपूर्ण सुरक्षा देणे, त्यांचे भविष्य उज्वल करणे, महिला सक्षमीकरण करणे, उद्योजक घडवणे, अश्या अनेकानेक संकल्पाद्वारे देशसेवेत योगदान देणे, हा आमचा प्रामाणिक दृष्टिकोन आहे. आपल्या सगळ्यांना जर समृद्ध व्हायचे असेल तर सहकाराला पर्याय नाही हे नक्की. संकल्पतत्वाचा हा धागा पकडून २८ ऑगस्ट १९८९ साली निर्मिती झाली ती महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेची अंबरनाथ आणि परिसरातील प्रत्येक तरुणाला स्वतःच्या पायावर उभे राहता यावे, त्यांना कुठल्याही प्रकारच्या आर्थिक मदतीसाठी दुसरीकडे जाण्याची गरज पडू नये म्हणून श्री महालक्ष्मी पतसंस्थेचे कार्य तेव्हापासून अखंड सुरु आहे. बघता-बघता ही संस्था कोकण विभागाच्या (ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हे) कार्यक्षेत्रात कार्यरत होऊन सध्या संस्थेच्या मुख्यकार्यालयासह ६ ठिकाणी स्वमालकीच्या शाखा कार्यरत आहेत. संस्थेची शहापूर शाखा दि. १९-०६-२०२२ रोजी उद्घाटन होऊन कार्यरत झाली. शाखेने नऊ महिन्यांच्या अल्पकाळात अहवाल सालाअखेर शहापूरकर सभासद व ग्राहकांच्या भरघोस पाठींब्याने रु. २ कोटी २५ लाखांचा संमिश्र व्यवसायाचा टप्पा पूर्ण केला आहे. शहापूरकरांच्या अभूतपूर्व प्रतिसादामुळे संस्था तेथे लवकरच स्वमालकीचे कार्यालय सुरु करीत आहे. आपल्या संस्थेने अहवाल सालात रु. १५० कोटी संमिश्र व्यवसायाचे उद्दिष्ट्य ठरविले होते. सर्व सभासद ग्राहकांच्या उत्तम प्रतिसादाने, कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नाने व संचालक मंडळाच्या सहकार्याने वर्षाअखेरीस रु. १४८ कोटी ८२ लाखांची उद्दिष्ट्यपूर्ती केली आहे. पुढील अहवाल सालात रु. २०० कोटींची उद्दिष्ट्यपूर्ती करण्याचा संस्थेचा मानस आहे. हे सर्व साध्य करीत असताना संस्थेचा जो पाया आहे तो संस्थेचा कर्मचारी वर्ग त्यांना समाधानकारक लाभ मिळावेत. ते आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावेत या दृष्टीकोनातून संस्था नेहमीच प्रयत्नशील असते, त्याचाच भाग म्हणून संचालक मंडळाने त्यांची

सुधारीत वेतनवाढ सुचविली आहे. काळानुरुप संस्थेचा कर्मचारी वर्ग प्रशिक्षित असणे गरजेचे आहे, त्या अनुषंगाने संस्था अधिकारी वर्गाला वेळोवेळी प्रशिक्षणासाठी पाठवित असते तसेच स्वतः दोन दिवशीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करीत असते. त्याचा परिणाम आपल्याला संस्थेच्या आर्थिक प्रगतीत दिसून येतो.

संस्थेच्यामार्फत बँकिंगच्या विविध सेवा पुरवल्या जातात. यामध्ये सगळ्या प्रकारच्या ठेव योजना तसेच कर्ज योजनासुद्धा आहेत. काळानुरूप संस्थेने स्वतःला अद्यावत ठेवून सर्व प्रकारची डिजिटल बँकिंग सुविधा सुद्धा उपलब्ध करून दिली आहे. या सगळ्याच योजनांचा आणि सुविधांचा यशस्वीरीत्या फायदा संस्थेचे हजारो सभासद घेत आहेत. वेळोवेळी त्यांनी दिलेल्या सूचनांचा आदर करत सेवेमध्ये प्रगती करण्यात येते. पारदर्शी कारभार, तत्पर सेवा, संपूर्ण सुविधा आणि आपलेपणा या सूत्रांवर संस्था काम करते. संस्थेत आलेल्या सभासदाला सेवेचे समाधान मिळावे यासाठी संस्थेचे कर्मचारी झटत असतात म्हणूनच व्यवहारापलीकडचं नातं इथे तयार झाले आहे आणि तीच आमची खरी संपत्ती आहे.

आपल्या आशिर्वादानेच महालक्ष्मीच्या सभासदांचा परिवार दिवसेंदिवस विशाल होत आहे. आज संस्थेचे ५० हजाराहून अधिक समाधानी सभासद-ग्राहक आहेत. याबद्दल आपले मनापासून धन्यवाद आम्ही आपल्या सर्वोत्तम सेवेसाठी वचनबद्ध आहोत, असेच सोबत रहा.

संस्थेचे सर्व संचालक, आर्थिक सल्लागार, कर्मचारी, दैनंदिन ठेव प्रतिनिधी, सभासद, ठेवीदार, कर्जदार यांच्या सक्रीय सहभागामुळे संस्था आधिकाधिक वेगवान होत आहे. आपला सहभाग असाच कायम राहावा ही अपेक्षा. पतसंस्थेच्या प्रगतीसाठी दिशा-दर्शकाचे कार्य करणाऱ्या सहकार विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी, संस्थेचे वैधानिक व अंतर्गत लेखापरीक्षण करणाऱ्या लेखापरीक्षकांनी दैनंदिन कामकाजामध्ये अधिक अचूकता येण्यासाठी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल सर्वांचे आभार !

## * शाखा निहाय सांपत्तीक स्थिती -

| शाखा | भाग भांडवल | ठेवी | कर्जे | व्याज वसुल |
|---|---|---|---|---|
| मुख्यालय | २,८८,९३,७५०.०० | ---- | ---- | ---- |
| अंबरनाथ | ---- | ४८,९३,०४,६८६.४३ | २५,६४,२५,१५७.०० | २,६२,९७,५६२.०० |
| बदलापूर | ---- | १७,४३,९२,३३३.४० | १६,२१,८५,२५०.०० | १,९५,९४,२४३.०० |
| कल्याण (पू.) | ---- | ३,४७,४५,६४२.०० | ६,०७,३३,०७३.०० | ७९,९३,३८७.०० |
| कल्याण (प.) | ---- | ७,५४,४५,४९२.३० | ७,१४,८०,१९०.०० | ६९,२२,२७०.०० |
| टिटवाळा | ---- | ६,९८,२४,५७६.३० | ७,१०,५३,६६५.०० | ७३,०३,१३६.०० |
| शहापुर | ---- | ८८,२२,२८०.०० | १,३७,६३,८८७.०० | ४,०४,८५५.०० |

**आर्थिक वर्ष २०२२- २३ आढावा -** सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात सर्व सभासद व ठेवीदार यांच्या भरघोस पाठींब्यावर आपल्या संस्थेस प्रगती साधता आली हे खालील तुलनात्मक आकडेवारीवरुन स्पष्ट होते.

| तपशील | २०२१-२०२२ | २०२२-२०२३ | रु. लाखात % वाढ / घट |
|---|---|---|---|
| **अ) जबाबदाऱ्या** | | | |
| १) भागभांडवल | २७७.१४ | २८९.०९ | ४.३१% |
| २) स्वनिधी | ४५५.४४ | ५०९.०६ | ११.७७% |
| ३) ठेवी | ७०६३.१९ | ८५२५.३५ | २०.७०% |
| ४) निव्वळ नफा | ८१.०४ | ९५.०५ | १७.२८% |
| **ब) मालमत्ता** | | | |
| १) कर्जे | ५२७४.६२ | ६३५६.४१ | २०.५०% |
| २) गुंतवणुक | २११६.०६ | २४४९.६६ | १७.६५% |
| ३) कायम व इतर मलमत्ता | २७९.३८ | ३०८.६८ | १०.४८% |
| **क) उत्पन्न** | | | |
| १) मिळालेले व्याज | ७६८.८४ | ८४६.८१ | १०.१४% |
| २) इतर उत्पन्न | २१.८१ | २९.७५ | ३६.४०% |
| **ड) खर्च** | | | |
| १) दिलेली व्याजे | ५७८.३१ | ६६६.१६ | १५.१९% |
| २) सेवक पगार व भत्ते | ४०.१९ | ४६.९० | १६.८९% |
| ३) इतर खर्च | ३४.७१ | ५४.८४ | ५७.९९% |
| ४) तरतुदी | ५६.३९ | १३.६० | -७५.८८% |

**आर्थिक प्रमाणके (सन २०२२-२३) -**

| अ.क्र. | तपशील | आदर्श प्रमाण % | प्रत्यक्ष प्रमाण |
|---|---|---|---|
| अ | **खेळत्या भांडवलाशी प्रमाण** | | |
| | १) वसूल भाग भांडवल | २ ते ४ | ३.०४% |
| | २) निधी | ४ ते ६ | ५.३६% |
| | ३) ठेवी | ८० ते ८५ | ८९.८७% |
| | ४) इतर देणी | २ ते ३ | ०.७०% |
| | ५) निव्वळ नफा | १ ते २ | १.००% |
| | ६) रोख व बँकेतील शिल्लक | ४ ते ६ | २.३६% |
| | ७) गुंतवणूक | २५ | २६.२४% |
| | ८) कर्जे | ६० ते ६५ | ६७.१०% |
| | ९) इतर येणी | ६ | १.३४% |
| | १०) एकूण उत्पन्न | ११ | ९.२४% |
| | ११) व्यवस्थापन खर्च | २ | १.०८% |
| ब | १) निव्वळ नफ्याचे उत्पन्नाशी प्रमाण | १० | १०.८४% |
| | २) मुदत ठेवीचे एकूण ठेवीशी प्रमाण | ७०% | ७०% |
| | ३) व्यवस्थापन खर्चाचे उत्पन्नाशी प्रमाण | ३० ते ३५ | ११.६९% |
| | ४) सी.डी.रेशो | ६५ ते ७० | ६६.०३% |
| | ५) निव्वळ अनुत्पादक जिंदगी प्रमाण | ५ | ३.४९% |
| | ६) भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) | ९% | ८% |
| | ७) एकूण ठेवीशी तरतला निधीचे प्रमाण (SLR) | २५% | ३१.१५% |
| | ८) एकूण ठेवींशी रोखता निधींचे प्रमाण (CRR) | १% | २.८०% |

**१) सभासद व भागभांडवल -** आपल्या संस्थेची सभासद संख्या दि. ३१ मार्च २०२२ अखेर ४८७२ इतकी होती. त्यामध्ये अहवाल साली ४१८ नवीन सभासद करून घेण्यात आले. पैकी १८१ सभासदांनी त्यांच्या सभासदत्त्वांचे राजीनामे दिल्याने या वर्षाअखेरीस ५१०९ एकूण सभासद आहेत.

पतसंस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. ५ कोटी असून अहवाल वर्षात भाग-भांडवलात लक्षणीय वाढ झाली आहे. मागील वर्षी पतसंस्थेचे वसूल भागभांडवल रुपये २,७६,९१,७००.०० होते. त्यामध्ये वाढ होऊन अहवाल वर्ष अखेरीस वसूल भाग भांडवल रुपये २,८८,९३,७५०.०० जमा झालेले आहे.

**२) स्वनिधी -** अहवाल सालाच्या सुरूवातीस राखीव निधी व इतर निधी मिळून रूपये ४,५५,४४,८१८/- जमा होते. सन २०२२-२३ अखेरीस त्यात रू. ५३,६१,३३९/- ने वाढ होऊन एकूण रूपये ५,०९,०६,१५७/- इतका स्वनिधी जमा आहे.

**३) ठेवी -** पतसंस्थेविषयी असलेला विश्वास हा ठेवींच्या आकड्यांमध्ये प्रतीत होतो. पतसंस्थेच्या ठेवी गतवर्षी रु. ७०,६३,१९,२३६/- होत्या. त्यामध्ये २०.७०% वाढ होऊन वर्ष अखेर एकूण ठेवी रु. ८५,२५,३५,०१०.००/- झाल्या आहेत. संस्थेच्या विविध ठेव योजनांमध्ये आपण सामील होऊन आपल्या विकासाबरोबर संस्थेच्या विकासास हातभार लावा.

| अ. क्र. | ठेव प्रकार | दि. ३१.०३.२२ अखेर शिल्लक | दि. ३१.०३.२३ अखेर शिल्लक | ठेवीदार | वाढ / घट | प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुदत ठेव | २८,४२,८३,३०६.०० | ३४,१८,६९,८४१.०० | ३८३३ | ५,७५,८६,५३५.०० | २०.२५% |
| २ | दामदुप्पट ठेव | ४,००,७६,०३८.०० | ४,०६,११,२३१.०० | ४२४ | ५,३५,१९३.०० | १.३३% |
| ३ | मासिक मिळकत ठेव | १८,०६,२०,७३९.०० | २१,४०,४१,९६०.०० | १४७३ | ३,३४,२१,२२१.०० | १८.५०% |
| ४ | लॉकर डिपॉझिट | ६,३७,३००.०० | ७,१२,५४०.०० | ८९ | ७५,२४०.०० | ११.८०% |
| ५ | जनविकास ठेव | १,२७,९८,४७८.०० | २,२९,७९,६४८.०० | ९८९ | १,०१,८१,१७०.०० | ७९.५४% |
| ६ | संकल्प ठेव | १,११,०८,३३०.०० | १,०९,१९,८७५.०० | २६७ | -१,८८,४५५.०० | -१.६९% |
| ७ | मासिक ठेव | ६९,३८,८९४.०० | ७०,५०,७४७.०० | ४०९ | १,११,८५३.०० | १.६१% |
| ८ | लखपती ठेव | ४७,२१,०७०.०० | ५८,६८,५७५.०० | १५८ | ११,४७,५०५.०० | २४.३०% |
| ९ | पेन्शन ठेव | ९,३९,९९२.०० | ११,७२,०३५.०० | ६ | २,३२,०४३.०० | २४.६८% |
| १० | इच्छापूर्ती ठेव | १०,१२,७४४.०० | ११,२१,३६३.०० | ६४ | १,०८,६१९.०० | १०.७२% |
| ११ | बालविकास ठेव | ८,३४,४३९.०० | ८,६९,५९२.०० | १९ | ३५,१५३.०० | ४.२१% |
| १२ | एजंट सुरक्षा ठेव | ३,८७,८०२.०० | ४,९८,६९४.०० | ३७ | १,१०,८९२.०० | २८.५९% |
| १३ | बचत ठेव | २,७६,७८,९३५.०८ | ४,३८,६९,६४६.४३ | ८३४८ | १,६१,९०,७११.३५ | ५८.४९% |
| १४ | दैनंदिन ठेव | १३,४२,८१,१६९.०० | १६,०९,४९,२६३.०० | ७६०२ | २,६६,६८,०९४.०० | १९.८५% |
| **१५** | **एकूण** | **७०,६३,१९,२३६.०८** | **८५,२५,३५,०१०.४३** | **२३७१८** | **१४,६२,१५,७७४.३५** | **२०.७०%** |

**४) कर्जवाटप - कर्जवसुली -** गतवर्षी रुपये ५२,७४,६२,१२१/- कर्ज येणे बाकी होते. अहवाल वर्षात विविध प्रकारचे जामीनकी व तारणी कर्ज रू. ३७,६५,०५,८२२/- वाटप केले असून अहवाल वर्षात रू. २६,८३,२६,७२१/- इतके कर्ज वसूल झाले आहे. दि. ३१.०३.२०२३ अखेर रू. ६३,५६,४१,२२२/- इतके कर्ज येणे बाकी आहे. अहवालसाली गतवर्षीपेक्षा २०.५०% कर्जवाटपात वाढ झाली आहे. तसेच संस्थेचे कर्ज व ठेवीचे प्रमाण (C. D. Ratio) ६६.०३% इतके आहे.

थकीत कर्जवसुलीकडे विशेष लक्ष देण्याचा संचालक मंडळाचा प्रयत्न असतो. सर्व प्रकारचे उपाय करून सुद्धा वसुली न झाल्याने नाईलाजाने काही थकीत कर्जदार व त्यांचे जामीनदार यांच्यावर कठोर कारवाई करावी लागते. सहकार कायद्यातील कलम

९१ व १०१ अंतर्गत दि. ३१.०३.२०२२ अखेर ७५ वसुली दाखल्यांची कारवाई चालू होती. अहवाल सालामध्ये नवीन ८ वसुली दाखले प्राप्त झाले. एकूण वसुली दाखल्यांपैकी वसुली दाखल्यांची रक्कम रू. ३१,५७,२९१/- वसूल झाली असून अहवाल सालाअखेर ५७ वसुली दाखल्यांची वसुलीची अंमलबजावणी सुरू आहे. कर्ज वसुलीचे कामकाज जलदगतीने होण्याकरीता कोकण महीला सह.पतसंस्था फेडरेशन लि. व ठाणे जिल्हा नागरी/पगारदार सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. ठाणे यांनी मोलाचे सहकार्य केले. त्यामुळे पतपेढीचा नेट एन्.पी.ए. ३.४९% इतका आहे.

**५) संचालक व नातेवाईकांना दिलेली कर्जे -** महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७५ (२) अन्वये संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांना पतपेढीकडून दिल्या गेलेल्या कर्जाची दि. ३१.०३.२०२३ अखेर कोणत्याही प्रकारची कर्ज रक्कम थकबाकी नाही.

| तपशील | ३१.०३.२१ अखेर कर्ज येणे रक्कम | सन २०२१-२२ कर्ज वाटप रक्कम | सन २०२१-२२ मधील वसूल रक्कम | ३१.०३.२२ अखेर शिल्लक | ३१.०३.२२ अखेर थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| संचालक, नातेवाईक | १५,६४,९४१.०० | --- | १,९५,८०७.०० | १३,६९,१३४.०० | ---- |

**६) गुंतवणुक -** सुरक्षितता व विश्वासार्हता या पार्श्वभूमीवर तरलतेपोटी विविध शेड्युल व मोठ्या सहकारी बँकांमध्ये अहवाल साला अखेर रूपये २४,८९,६६,६६१/- मुदतठेवीमध्ये गुंतवणूक करण्यात आली आहे. संस्थेने राखीव निधीची दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि. ठाणे या बँकेत १००% गुंतवणूक केली आहे.

**७) नफा व नफा विभागणी -** अहवाल वर्षात पतसंस्थेस एकूण खर्च व तरतुदी वजा जाता **रु. ९५,०४,६२१.३४** इतका नफा झाला आहे व मागील वर्षाचा शिल्लक नफा **रु. ९३४.९५** असा मिळून एकूण नफा **रु. ९५,०५,५५६.२९** इतका नफा झाला आहे. सहकार खाते यांच्या सूचना आणि नियमानुसार एकूण नफ्याची विभागणी संचालक मंडळाने सुचविली आहे. त्यास मान्याता मिळाली अशी विनंती मी, संचालक मंडळाच्या वतीने आपण सर्वांस करीत आहे. त्यास मंजूरी मिळावी.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | राखीव निधी २५ % | रू. | २३,७६,३८९.०० |
| २) | लाभांश १० % | रू. | २७,७८,०९९.०० |
| ३) | इमारत निधी | रू. | १९,००,०००.०० |
| ४) | संशयीत व बुडीत निधी | रू. | १५,००,०००.०० |
| ५) | थकीत कर्ज व्याज निधी | रू. | २,५०,०००.०० |
| ६) | गुंतवणूक चढ-उतार निधी | रू. | १,००,०००.०० |
| ७) | सहकार शिक्षण प्रशिक्षण निधी | रू. | १,७५,०००.०० |
| ८) | कर्मचारी कल्याण निधी | रू. | १,००,०००.०० |
| ९) | लाभांश समीकरण निधी | रू. | १,००,०००.०० |
| १०) | धर्मदाय निधी | रू. | ५०,०००.०० |
| ११) | व्यवसायवृद्धी व विकास निधी | रू. | १,५०,०००.०० |
| १२) | आकस्मित निधी | रू. | २५,०००.०० |
| १३) | शिल्लक नफा | रू. | १०६८.२९ |
| | **एकूण** | **रु.** | **९५,०५,५५६.२९** |

**८) संचालक मंडळ -** संचालक मंडळाच्या वर्षभरात एकूण १३ सभा झाल्या आहेत. संस्थेचे दैनंदिन कामकाज पोटनियमांना अनुसरून व सहकारी कायद्याच्या तरतुदीनुसार होण्याच्या दृष्टीकोनातून संस्थेच्या कार्यालयात नियमित येऊन सेवक वर्गाबरोबर योग्य ती सल्लामसलत करून कामकाज हाताळीत असतात. सहकार क्षेत्रात होणारे अमुलाग्र बदल स्विकारून, संस्थेची उज्वल परंपरा राखणे, संस्थेस प्रगतीपथावर नेणे व सर्वसामान्य सभासदांच्या आर्थिक अडचणींचे निवारण करणे या उद्दीष्टांसाठी संचालक मंडळ सदैव कार्यरत असते.

**९) कर्मचारी प्रशिक्षण -** आधुनिक तंत्रज्ञानात होणारे बदल तसेच, नियमांत वारंवार होणारे बदल यानुसार आपले ज्ञान व माहिती अद्ययावत रहावी, या हेतूने प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येते. पतसंस्थांना आकारला जाणाऱ्या आयकरांबाबत कर्ज वितरण व कर्ज वसूली धोरण, उत्पन्न व खर्च धोरण, गुंतवणूक धोरण, अतंर्गत व्यवस्थापन, इत्यादी विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी पतसंस्था प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करते. त्यास संचालक, कर्मचारी व दै./मा. ठेव वसुली प्रतिनिधी उपस्थित राहून मार्गदर्शन घेतात. अहवाल सालात संस्थेने सर्व अधिकारी वर्ग व वसुली अधिकारी यांना दि. २२ व २३ सप्टेंबर २०२२ रोजी लोणावळा येथे प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले. तसेच दि. १३-११-२०२२ ते १४-११-२०२२ रोजी संस्थेचे संचालक व सर्व कर्मचारी यांच्यासाठी सुप्रसिद्ध को.ऑप.कन्सल्टंट श्री. संदिपजी पाटील यांचा विशेष प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला.

**१०) जनता अपघात विमा -** पतसंस्थेने आपल्या सर्व इच्छुक सभासदांसाठी व कर्जदारांसाठी दि ओरिएण्टल इन्श्युरंन्स कंपनी लि. च्या माध्यमातून वैयक्तिक जनता अपघात विमा पॉलिसी अंतर्गत विमा उपलब्ध करून दिला आहे. या पॉलिसीची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे....

१) किमान रू. १,००,०००/- व कमाल रू. ५,००,०००/- पर्यंत अपघात विमा संरक्षण उपलब्ध.

२) रक्कम रू. ५,००,०००/- च्या विम्यासाठी तीन वर्षाकरीता रू. ८१०/- हप्ता.

३) कोणत्याही कागदपत्रांची आवश्यकता नाही. कुठल्याही प्रकारच्या वैद्यकिय तपासणीची गरज नाही.

**११) ग्राहक सेवा - सुविधा -** सभासद ग्राहकाला बँकींग मधील सर्व सेवा सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करण्याच्या दृष्टीकोनातून पतसंस्थेने लॉकर्स सुविधा आर.टी.जी.एस्. (RTGS) व एन्.इ.एफ्.टी. (N.E.F.T.) सुविधा व एस्.एम्.एस्. (SMS) बँकींग सुविधा सुरू करण्यात आल्या आहेत.

**१) मोबाईल बँकिंग-** आता आपले बँकिंग व्यवहार आपण घरबसल्या एका क्लिकवर करू शकता. हा आपल्या संस्थेने सभासदांसाठी मोबाईल बँकिंग सुविधा उपलब्ध करून दिली आहे. वेळेची बचत, हवी ती प्रत्येक सुविधा, सुरक्षितता आणि हव्या त्या क्षणी उपलब्धता ही संस्थेच्या मोबाईल बँकिंगची वैशिष्ट्ये आहेत. श्री महालक्ष्मी पतसंस्थेने मोबाईल ॲप डाउनलोड करा आणि प्रत्यक्ष अनुभव घ्या.

**२) लॉकर्स सुविधा -** आजच्या काळात आपल्या मुल्यवान गोष्टी कुठे ठेवायच्या हा मोठाच प्रश्न असतो. त्या प्रश्नाचे खात्रीशीर उत्तर म्हणजे श्री महालक्ष्मी पतसंस्था आपल्या अंबरनाथ व बदलापूर शाखेतून देत असलेली लॉकर सुविधा आपल्या साधन संपत्तीची काळजी आम्ही पूर्ण जबाबदारीने घेतो. आमच्या सुरक्षित लॉकर सुविधेचा लाभ घ्या आणि निश्चिन्त व्हा.

**३) RTGS / NEFT - NEFT/RTGS** द्वारे त्वरीत आपल्या शाखेमधून ऑनलाईन पद्धतीने खातेदाराला कोणत्याही बँकेच्या खातेदाराच्या खात्यावर १५ मिनीटात पैसे पाठवता येतात.

**४) CHEQUE COLLECTION SERVICE -** खातेदाराच्या नावाने असलेले कोणत्याही बँकेचे ५०,००० रु.

पर्यंतचे चेक क्लिअरिंग करून मिळतात.

**५) CORE BANKING SERVICE -** श्री महालक्ष्मी पतसंस्थेच्या सर्व शाखा ऑनलाईन संगणक प्रणालीने एकमेकांना जोडलेल्या आहेत. खातेदार कोणत्याही शाखेमधून आपल्या खात्यावर व्यवहार करू शकतो.

**१२) श्रद्धांजली -** अहवाल सालामध्ये देशातील थोर नेते, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक, शास्त्रज्ञ, जवान, सहकार तज्ञ, आपल्या संस्थेचे मान्यवर सभासद, ठेवीदार, हितचिंतक तसेच नैसर्गिक आपत्तित मृत पावलेल्या अशा थोर विभूती पंचतत्वात विलीन झाल्या त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

**१३) आभार व ऋणनिर्देश -** आपल्या पतसंस्थेस वेळोवेळी ज्या-ज्या व्यक्तिंनी सहकार्य दिले त्यांचा ऋणनिर्देश करणे क्रमपात्र ठरेल. मा. श्री. आप्पाराव घोलकर विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, मा.डॉ. किशोर मांडे जिल्हा उपनिबंधक सह संस्था ठाणे, मा. श्री. आर. एस. लोखंडे, सहाय्यक निबंधक सह. संस्था, अंबरनाथ तालुका यांनी पतसंस्थेस भेट देऊन बहुमुल्य मार्गदर्शन करून प्रोत्साहीत केले. या मान्यवरांची संस्था ऋणी आहे. मा.अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मुंबई, कोकण महीला सह. पतसंस्था फेडरेशन लि. च्या अध्यक्षा श्रीमती प्रभू घाटे व वसूली व विक्री अधिकारी श्री. प्रकाश निकम, ठाणे जिल्हा नागरी / पगारदार सह. पतसंस्था फेडरेशनचे मा.अध्यक्ष, सचिव, विशेष वसुली व विक्री अधिकारी, जी. डी. कुलकर्णी अँड असोसिएट्स व अधिकारी वर्ग, ओरीएण्टल इंश्युरंस कं. चे विकास आधिकारी श्री. एन्. एस. ढवळे, ॲड सुधीर जगदाळे, श्री टेक्नीकल कन्सल्टंट ॲड. व्हाल्यूअर्स चे विजय फाटक यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शन व सहकार्याबद्दल आभार.

पोलीस स्टेशन अंबरनाथ, बदलापूर व कल्याण व डोंबिवली यांनी वसुलीकामी विशेष सहकार्य केल्याबद्दल आभार. पतसंस्थेची संगणक कार्यप्रणाली कार्यन्वित करणारे नेटविन सिस्टीम्स ॲन्ड सॉफ्टवेअर आणि अधिकारी वर्ग, दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि., दि सारस्वत को. ऑप. बँक लि., डोंबिवली ना. सह. बँक लि., कल्याण जनता सह. बँक लि., शामराव विठ्ठल को-ऑप. बँक लि., अंबरनाथ जयहिंद को. ऑप .बँक लि., बॅक ऑफ बडोदा, ठाणे जनता सहकारी बँक लि. तसेच कार्यक्षेत्रातील सर्व सह. पतसंस्था यांचे पदाधिकारी व कर्मचारी वर्गाचे सहकार्याबद्दल आभार.

अंतर्गत हिशोब तपासनीस मा. श्री. आर. के. पाटील (प्रमाणित लेखापाल) व त्यांचे अधिकारी यांनी संस्थेच्या दैनंदिन कामकाजात वेळोवेळी मार्गदर्शन केल्याबद्दल मी खास ऋण व्यक्त करतो. संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संचालक, कर्मचारी, ठेव प्रतिनिधी, सभासद, ठेवीदार आणि हितचिंतक यांनी दिलेले सहकार्य व प्रोत्साहन यामुळेच संस्थेने यशस्वी वाटचाल केली आहे या सर्वांचा मी व्यक्तिश: आभारी आहे.

जयहिंद ! जय सहकार !!

आपला

**श्री. प्रकाश शंकर पाटील (अध्यक्ष)**

श्री महालक्ष्मी नागरी सह. पतपेढी मर्या. अंबरनाथ

# परिशिष्ट 'अ'

(रुपये लाखात)

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नाव | : | **श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ** |
| प्रशासकीय कार्यालय | : | १०३, साकेत अपार्टमेंट, पहिला माळा, रोटरी क्लब समोर, वडवली विभाग, अंबरनाथ (पूर्व), जि. ठाणे. |
| नोंदणी क्र. | : | टि. एन्.ए. / यु. एल. आर. / आर. एस. आर. (सी.आर.) / ३७४ / १९८९-९० |
| नोदंणी दिनांक | : | २८ ऑगस्ट १९८९ |
| संस्थेचे कार्यक्षेत्र | : | कोकण विभाग मर्यादित (ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग) |
| शाखा | : | प्रशासकीय कार्यालयासह सहा शाखा<br>१) अंबरनाथ २) बदलापूर<br>३) कल्याण (पू.) ४) कल्याण (प.)<br>५) टिटवाळा ६) शहापूर |
| सभासद संख्या | : | ५,१०९.०० |
| वसूल भाग भांडवल | : | रु. २८८.९३ |
| राखीव व इतर निधी | : | रु. ५०९.०६ |
| ठेवी | : | रु. ८५२५.३५ |
| कर्जे | : | रु. ६३५६.४१ |
| गुंतवणुक | : | रु. २४८९.६६ |
| ढोबळ एन्.पी.ए. | : | ६.२७% |
| निव्वळ एन्. पी. ए. | : | ३.४९% |
| ऑडीट वर्ग | : | अ |
| अहवाल साली नफा | : | रु. ९५.०५ |
| कर्मचारी वर्ग | : | २९ |
| खेळत भांडवल | : | रु. ९४८५.८६ |

## ताळेबंद

| रक्कम रु. २०२१-२२ | जबाबदाऱ्या व देणे | | रक्कम रु. २०२२-२३ |
|---|---|---|---|
| ५,००,००,000.00 | **अधिकृत भाग भांडवल** | | ५,००,००,000.00 |
| **२,७६,१९,७००.००** | **वसुल भाग भांडवल** | २,८८,९३,७५0.00 | |
| **२२,८००.००** | **भाग अनामत** | १५,५0७.00 | **२,८९,०९,२५७.००** |
| **१,४४,६१,९८८.००** | **राखीव निधी** | १,६५,२७,२८३.00 | **१,६५,२७,२८३.००** |
| **३,१०,८२,८३०.७०** | **इतर निधी** | | |
| ८७,२८,७८२.00 | इमारत निधी | ९७,९५,७९२.00 | |
| ३,२१,६९७.00 | लाभांश समीकरण निधी | ५,२१,६९७.00 | |
| ३,0६,0८५.00 | सभासद कल्याण निधी | ५,0६,0८५.00 | |
| ३,२५,000.00 | गुंतवणुक चढ उतार निधी | ४,२५,000.00 | |
| ५0,000.00 | धर्मदाय निधी | ७१,४९९.00 | |
| २,५२,५00.00 | कर्मचारी कल्याण निधी | ३,५२,५00.00 | |
| ७,५९,८५0.00 | निवडणूक निधी | ७,५९,८५0.00 | |
| १,५२,२७,0६९.00 | संशयीत व बुडीत कर्ज निधी | १,५९,९७,९१४.00 | |
| २0,८0,८३२.00 | थकीत कर्जव्याज निधी | २२,६६,३७७.00 | |
| १६,७७,४७0.00 | कर्मचारी ग्रॅच्युइटी निधी | १९,0१,५५७.00 | |
| १२,१७,000.00 | उत्तम जिंदगी तरतूद | १३,0२,000.00 | |
| १,३६,५४५.७0 | सहकार शिक्षण प्रशिक्षण निधी | २,0५,१५0.७0 | |
| ... | व्यवसायवृद्धी व विकास निधी | ७७,४५३.00 | |
| ... | अकस्मित निधी | १,९६,000.00 | **३,४३,७८,८७४.७०** |
| **७०,६३,१९,२३६.०८** | **ठेवी** | | |
| २८,४२,८३,३0६.00 | मुदत ठेव | ३४,१८,६९,८४१.00 | |
| ४,00,७६,0३८.00 | दामदुप्पट ठेव | ४,0६,११,२३१.00 | |
| १८,0६,२0,७३९.00 | मासिक मिळकत ठेव | २१,४0,४१,९६0.00 | |
| १३,४२,८१,१६९.00 | दैनंदिन ठेव | १६,0९,४९,२६३.00 | |
| ६९,३८,८९४.00 | मासिक ठेव | ७0,५0,७४७.00 | |
| १,२७,९८,४७८.00 | जनविकास ठेव | २,२९,७९,६४८.00 | |
| १,११,0८,३३0.00 | संकल्प ठेव | १,0९,१९,८७५.00 | |
| ८,३४,४३९.00 | बालविकास ठेव | ८,६९,५९२.00 | |
| **७,३२,५९,३१८.७०** | **एकूण बेरीज पुढील पानावर चालू** | | **७,९८,१५,४१४.७०** |

## पत्रक (दि. ३१.०३.२०२३ अखेर)

| रक्कम रु. २०२१-२२ | मालमत्ता व येणे | | रक्कम रु. २०२२-२३ |
|---|---|---|---|
| **१४,३४,५८४.००** | **रोख शिल्लक** | | **१६,५३,७७०.००** |
| **१,८३,३५,५१२.७३** | **बँक शिल्लक** | | **२,०७,५५,६४९.१२** |
| **२१,१६,०६,०७९.००** | **गुंतवणूक** | | |
| ५,०००.०० | भाग | ५,०००.०० | |
| १,४४,७२,३००.०० | राखीव निधी | १,६५,२७,३००.०० | |
| १९,७१,२८,७७९.०० | मुदत ठेवी | २३,२४,३४,३६१.०० | **२४,८९,६६,६६१.००** |
| **५२,७४,६२,१२१.००** | **कर्जे** | | |
| | **विनातारणी कर्ज** | | |
| ५,०८,७१,०९१.०० | मध्यम मुदत कर्ज | ४,८५,५७,४८२.०० | |
| १,३०,६९,३४७.०० | व्यवसाय कर्ज | २,८२,२६,७४२.०० | |
| ५,००,५०७.०० | तातडीचे कर्ज | ५,९८,४१४.०० | |
| ५०,४५,८७३.०० | नाममात्र सभासद कर्ज | ६०,३२,९४४.०० | |
| | **तारणी कर्ज** | | |
| ८,३३,१६,२१५.०० | गृहतारण कर्ज | ९,३१,९६,९५७.०० | |
| २५,५५,४४,३५०.०० | व्यवसायिक (मॉर्गेज) कर्ज | २९,८२,८१,०३७.०० | |
| ३,६१,८९,५१२.०० | सोने तारण कर्ज | २,२९,९५,४९६.०० | |
| ९४,८४,२७०.०० | वाहन तारण कर्ज | १,१३,७२,८२२.०० | |
| ५,६९,६१,८९३.०० | मुदत ठेव तारण कर्ज | ७,७४,०९,४७९.०० | |
| १,६०,२५०.०० | दैनंदिव ठेव तारण कर्ज | १,९१,५९९.०० | |
| ६३,२७४.०० | वस्तू खरेदी तारण कर्ज | ४,६८,६८२.०० | |
| १,५९,१४४.०० | एन्. एस. सी्. तारण कर्ज | ६,९२,२६८.०० | |
| १६,४९,४९८.०० | कर्मचारी मध्यम मुदत कर्ज | १७,९७,८३०.०० | |
| १,४४,४६,८९७.०० | महालक्ष्मी सुवर्णतारण कर्ज | ४,५८,१९,४७०.०० | **६३,५६,४१,२२२.००** |
| **२,२८,२९,०७५.००** | **स्थावर मालमत्ता (इमारत)** | | **२,२२,५८,३४८.००** |
| **७८,१६,६७,३७१.७३** | **एकूण बेरीज पुढील पानावर चालू** | | **९२,९२,७५,६५०.१२** |

## ताळेबंद

| रक्कम रु. २०२१-२२ | जबाबदाऱ्या व देणे | | रक्कम रु. २०२२-२३ |
|---|---|---|---|
| **७,३२,५९,३१८.७०** | **मागील पानावरुन** | | **७,९८,१५,४१४.७०** |
| १०,१२,७४४.०० | इच्छापुर्ती ठेव | ११,२१,३६३.०० | |
| ४७,२१,०७०.०० | लखपती ठेव | ५८,६८,५७५.०० | |
| ३,८७,८०२.०० | एजंट सुरक्षा ठेव | ४,९८,६९४.०० | |
| ९,३९,९९२.०० | पेंशन ठेव | ११,७२,०३५.०० | |
| ६,३७,३००.०० | लॉकर डिपाझिट | ७,१२,५४०.०० | |
| २,७६,७८,९३५.०८ | बचत ठेव | ४,३८,६९,६४६.४३ | **८५,२५,३५,०१०.४३** |
| **४४,०५,६१९.००** | **देणी व तरतुदी** | | |
| १,९८,७६५.०० | ऑडीट फी | २,५७,२४०.०० | |
| ४०,०८१.०० | अंतर्गत लेखा परी. फी. | ५०,०८१.०० | |
| ३,१३,५९९.०० | सानुग्रह अनुदान | ३,३०,५९१.०० | |
| १८,५२८.०० | कर्मचारी भविष्य नि. निधी | --- | |
| ६०,३७६.०० | टि.डी.एस्. | ९१,९७५.०० | |
| १८,०६,४२३.०० | देणे लाभांश | २०,८८,२७३.५० | |
| १,८२,०६९.०० | अनामत | १,२९,८५६.०० | |
| १७,६९,८८२.०० | सिक्युरिटी अनामत | ३७,१६,३३०.०० | |
| १५,८९६.०० | सभासद विमा खाते | ६६,२७८.०० | **६७,३०,६२४.५०** |
| **८१,०५,१८९.९५** | **नफा** | | |
| | मागील शिल्लक नफा (२१-२२) | ९३४.९५ | |
| | चालू वर्षाचा नफा (२२-२३) | ९५,०४,६२१.३४ | **९५,०५,५५६.२९** |
| **७९,२०,८९,३६३.७३** | **एकूण** | | **९४,८५,८६,६०५.९२** |

## पत्रक (दि. ३१.०३.२०२३ अखेर)

| रक्कम रु. २०२१-२२ | मालमत्ता व येणे | रक्कम रु. २०२२-२३ |
|---|---|---|
| ७८,१६,६७,३७१.७३ | मागील पानावरुन | १२,१२,७५,६५०.१२ |
| ३२,५५,१५५.00 | फर्निचर व डेडस्टॉक | ५५,०७,११०.00 |
| २,२०,१५०.00 | संगणक प्रणाली | २,०३,१२४.00 |
| ७,०१,०११.00 | वाहन खरेदी | ६,३०,१८२.00 |
| १,६५,११९.00 | स्टेशनरी साठा | १,८१,६२0.00 |
| ९,५00.00 | टेलिफोन अनामत | ९,५00.00 |
| ५,000.00 | बी.इ.एस्.टी. अनामत | ५,000.00 |
| ४,७९0.00 | वीज अनामत | ४,७९0.00 |
| १,८५0.00 | भारत गॅस डिपॉझिट | १,८५0.00 |
| ५७,९५४.00 | मुद्रांक शुल्क | ४१,७३0.00 |
| ६,८८,८५३.00 | १०१ कारवाई खर्च | ४,२३,६३९.00 |
| १२,३२,५९२.00 | इन्कम टॅक्स | १२,३२,५९२.00 |
| २१,३०,४३२.00 | बँक टी.डी.एस्. | ३६,९६,६९६.00 |
| १९,४९,५०६.00 | गुंतवणुकीवरील येणे व्याज | ५७,७१,४४२.00 |
| --- | ॲडव्हान्स | १५,00,000.00 |
| --- | कार्यालय ठेव | १,00,000.00 |
| ७९,२०,८९,३६३.७३ | एकूण | १४,८५,८६,६०५.१२ |

श्री. सुनिल ह. घनवट (कार्यकारी संचालक) | श्री. मनोहर पां. जाधव (उपाध्यक्ष) | श्री. प्रकाश शं. पाटील (अध्यक्ष)

## उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२०२२ ते ३१/३/२०२३ अखेर

| रक्कम रूपये २०२१-२२ | खर्च | | रक्कम रूपये २०२२-२३ |
|---|---|---|---|
| **५,७८,३१,९०४.३७** | **अ) व्याज खर्च** | | |
| ५,१५,५५,४६८.०० | १) ठेवीवरील व्याज | ५,८७,८६,९४६.०० | |
| ३५,९९६.३७ | २) बँक चार्जेस | ६,२६८.८१ | |
| ४७६.०० | ३) बँक कर्ज व्याज | १९,९३८.०० | |
| ६२,३९,९६४.०० | ४) दैनंदिन ठेव कमिशन | ७८,०३,१९२.०० | **६,६६,१६,३४४.८१** |
| **४०,१९,६९३.००** | **ब) व्यवस्थापकीय खर्च (ब-१)** | | |
| ३९,९६,७७३.०० | १) सेवक पगार | ४६,७३,७०७.०० | |
| २२,९२०.०० | ३) कर्मचारी गणवेश | १७,१७२.०० | **४६,९०,८७९.००** |
| **११,१०,५५२.००** | **ब-२)** | | |
| ६१,५२३.०० | १) पोस्टेज खर्च | २८,७१६.०० | |
| ५,९०,१८४.०० | २) स्थावर मालमत्ता विमा खर्च | ६,४४,३०८.०० | |
| १,०७,५५०.०० | ३) संगणक/इन्व्हरर्टर देखभाल दुरुस्ती | १,१५,१४०.०० | |
| २,५७,५००.०० | ४) वीज बील | ३,३७,७४०.०० | |
| ५३,८८०.०० | ५) टेलीफोन बिल | ३९,४३०.०० | |
| -- | ६) स्थावर मालमत्ता बांधकाम खाते | २,६४,०००.०० | |
| ३६,७६५.०० | ७) मालमत्ता कर | १,२६,९१२.०० | |
| ३,१५०.०० | ८) इलेक्ट्रीक मेंटनंस्/पाणी बील | ९,५५०.०० | **१५,६५,७९६.००** |
| **५,०९,१६०.००** | **ब-३)** | | |
| ४,८६,१६०.०० | १) सॉफ्टवेअर सर्व्हीस चार्जेस | ५,०७,९९०.०० | |
| २३,०००.०० | २) प्रोफेशनल फी | ८४,१००.०० | **५,९२,०९०.००** |
| **६,३४,७१,३०९.३७** | **एकूण बेरीज पुढील पानावर चालू** | | **७,३४,६५,१०९.८१** |

# उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२०२२ ते ३१/३/२०२३ अखेर

| रक्कम रूपये २०२१-२२ | उत्पन्न | | रक्कम रूपये २०२२-२३ |
|---|---|---|---|
| **७,६८,८४,८४१.९६** | **क) मिळालेले व्याज** | | |
| ६,४६,८८,६४७.३४ | १) कर्ज व्याज वसुल | ६,८५,१५,४५३.00 | |
| १,२१,९६,१९४.६२ | २) बँक गुंतवणूक व्याज | १,६१,६५,४६८.00 | |
| -- | ३) लाभांश बँक | १५0.00 | **८,४६,८१,०७१.००** |
